[Date]

# फिलिप्पैकरांस

Philippians

# फिलिप्पैकरांस

## 1

1 सर्व अध्यक्ष, सेवक (देखरेख करणारे) तसेच सहकर्मींसह पौल आणि तीमथ्य जे येशू ख्रिस्तांचे सेवक आहेत,
आम्हां सर्वांकडून ख्रिस्त येशूंच्या पवित्र लोकांच्या नांवे जे फिलिप्पै येथे राहतात.
2 आपला परमेश्वर पिता आणि स्वामी येशू ख्रिस्त यांच्याकडून तुम्हांस अनुग्रह व शांति असो.
3 तुमचे स्मरण होताच मी आपल्या परमेश्वराचे आभार मानितो. 4 तुमच्यासाठी मी नेहमी आनंदाने विनंती करितो.
5 कारण हेच, की येशू-वार्ता प्रसाराच्या कार्यांत, तुमची सहभागिता पहिल्या दिवसापासूनची आहे. 6 परमेश्वराने तुम्हांमध्ये
जे एक चांगले कार्य प्रारंभिले आहे, ते कार्य परमेश्वर येशू ख्रिस्तांच्या दिवसांपर्यंत पूर्ण करीत राहील याविषयी मला
खात्री आहे.
7 तुम्ही सगळे माझ्या मनात असे काही खोलवर वसला (मनांत जागा घेणे) आहा, की मला वाटले व माझ्याकरता तेच
बरे देखील आहे. आनंद वार्तेविषयीची पुष्टि (उत्तरें) व प्रमाण देण्यासंबंधी मी तुमच्याविषयी असा विचार बाळगतो, की
परमेश्वरी अनुग्रहात तुम्हांला माझ्याबरोबर सहभागी होता येईल. 8 सृष्टीचा स्वामी या सत्याविषयी साक्षी आहे, की मी
येशू ख्रिस्तांच्या स्नेहासह, तुमच्यावर कशा प्रकारे अति प्रेम करितो.
9 मी प्रार्थना करितो की तुमचे प्रेम, ज्ञान आणि समंजसपणा (सर्व प्रकारच्या विवेकांसह) अधिकाधिक ओसंडून उतू
जात राहो. 10 येशू ख्रिस्तांच्या दिवसापर्यंत तुम्ही प्रामाणिक रहा, व कशा प्रकारेही ठेचाळण्याचे कारण होऊ (बनू) नका,
आणि ज्या गोष्टी सर्वोत्तम आहेत त्याच प्रिय जाणा (मान्य करा). 11 ख्रिस्त येशूंच्याद्वारे उत्पन्न होणारा जो सच्चेपणा, त्या
‘सत्याच्या हंगामाच्या फळांनी ' तुम्ही गच्च भरुन जावे, जी परमेश्वराची स्तुति आणि प्रशंसा करण्यासाठीची असतात.
12 बंधूभगिनींनो, माझी इच्छा आहे, की जे काही माझ्यासंगे घडले त्या सर्वांमुळे येशु-वार्तेची वृद्धि (वाढ) झाली हे
तुम्हांला समजावे. 13 त्याच्या परिणामी असे झाले, की राजमहालाचे सुरक्षा-कर्मी (या लोकांत) व दुसऱ्या स्थानांत ही
गोष्ट प्रगट झाली की मी येशू ख्रिस्तांकरिता कैदी (बंधनांत) आहे. 14 मी कैदेत असण्याच्या साक्षीमुळे (कारणांमुळे)
अनेक ख्रिस्ती भाऊ बहिणींनी धाडस व बल प्राप्त केले, आणि ते निर्भय होऊन परमेश्वराचे वचन सांगतात.
15 काही लोक हेव्याने प्रेरित होऊन संदेश देतात, परंतु काही चांगल्या अंतःकरणाने (उत्तम भावनेने). 16 जे लोक प्रेमाने
वचन सांगतात, त्यांना ठाऊक आहे की मी येशूवार्तेच्या रक्षणासाठी (माझी नियुक्ति)नेमलेला आहे. 17 दुसरे लोक
चांगल्या हेतूने नव्हे पण या स्वार्थी इच्छेने आणि असा विचार करून वचन सांगतात, की त्याद्वारे तुरूंगात माझ्याकरिता
अधिक संकटें (दुःख-पीडा) उत्पन्न व्हावीत. 18 तर मग याचा परिणाम काय आहे? केवळ हाच, की सर्व प्रकारें, मग
बहाण्याने असो किंवा खरेपणाने ख्रिस्तांविषयी सांगितले जाते आहेच, यांतच मी आनंदित आहे आणि राहणार देखील.
19 कारण मला ठाऊक आहे की तुमच्या प्रार्थनांच्या आणि येशू ख्रिस्तांच्या आत्म्याच्या साहाय्याने माझी सुटका
(स्वातंत्र्य) होईल. 20 नेहमीप्रमाणे आज देखील मी पूर्ण हृद्य इच्छेने (उत्कट भावना) व महान आशा बाळगून असे म्हणू
शकतो, की मी कोणत्याही गोष्टीमुळे अजिबात लाजणार नाही परंतु मोठे धाडस बाळगीन जेणेकरुन मी मेलो किंवा
जगलो, तरी माझ्या जीवनाद्वारे येशूंना आदर सन्मान मिळेल. 21 कारण माझ्याकरिता जिवंत रहाणे ख्रिस्त आणि मरणे
फायद्याचे आहे. 22 पण जर मी देहात जिवंत राहिल्याने माझ्या परिश्रमाचे फळ मिळणार असेल, तरीपण मला माहीत
नाही की मी कशाची निवड करावी. 23 मी या दोन्हीमध्ये फंसलो आहे, माझ्याठायी अशी इच्छा आहे की ख्रिस्तांजवळ
राहण्याकरिता मी येथून निघून जावे, आणि ते फारच उत्तमही आहे. 24 परंतु माझे देहाठायी जिवंत राहणे तुमच्यासाठी
जास्त लाभाचे आहे. 25 मला पूर्ण भरंवसा आहे व या गोष्टींमुळे मला खात्रीपूर्वक ठाऊक आहे, की मी तुमच्या वृद्धीत
आणि विश्वासात आनंदा-निमित्ताने तुमच्यासाठी राहणार. 26 यासाठी की मी तुमच्याजवळ आल्यामुळे, ख्रिस्त येशूंठायी
तुमचा आनंद आणखी अधिक व्हावा.
27 कारण जरी मी तुमच्याकडे आलो व पाहिले, किंवा तुमच्यांमध्ये उपस्थित राहिलो नाही, तरी तुमचे आचरण

ख्रिस्तांच्या महान उद्धारवार्तेयोग्य असावे; हे देखील मी ऐकावे की तुम्ही एका आत्म्यांत स्थिर होऊन एकमनाने,
येशूवार्तेच्या विश्वासाकरिता एकत्र होऊन, भरपूर प्रयत्न करीत असता. 28 जे तुमचा विरोध करितात, त्यांना तुम्ही भीत
नाही. हे त्यांच्या विनाशाचे, त्यांच्याकरिताचे एक स्पष्ट चिन्ह (निशाण) आहे, परंतु तुमच्याकरिता, ते उद्धाराचे स्पष्ट
(ठळक) चिन्ह आहे, जे परमेश्वरापासूनचे (द्वारे)आहे. 29 ख्रिस्तांमुळे तुमच्यावर हा अनुग्रह झालेला आहे, की तुम्ही
ख्रिस्तांवर केवळ विश्वासच ठेवू नये, पण त्यांच्यासाठी दुःख देखील सहन करावे. 30 जशी झुंज (संघर्ष) देताना तुम्ही
मला पाहिले आहे, आणि ऐकतही आहा, की मी आताही संघर्ष करतो आहे, तीच झुंज (संघर्ष) तुम्ही स्वतःही देत आहा.

## 2

1 म्हणून जर ख्रिस्तांठायी काही शांति- प्रोत्साहन (हिंमत), प्रेम-सांत्वना, पवित्र आत्म्याची सहभागिता, प्रेमपूर्ण कोमल
भावना आणि करूणा (दया) ही सर्व आहेत, 2 तर एकमेकांकरिता असलेल्या प्रेमाखातर एक मन, समान प्रेम, एकच
रवैय्या (व्यवहार- वर्तन) असू द्या, म्हणजे ते पाहून मी आनंदाने पुरेपूर व्हावे. 3 आपल्या नांवाकरिता, किंवा स्वार्थ
भावना बाळगून काहीही केले जाऊ नये, परंतु अंतःकरणाच्या लीनतेने प्रत्येकाने दुसऱ्याला आपल्यापेक्षा उत्तम
(चांगला) मानावे. 4 प्रत्येकाने केवळ आपल्याच फायद्याच्या बाबींकडे लक्ष न लावता दुसऱ्यांच्या लाभांकडेही लक्ष
द्यावे.
5 तुमच्याठायी तेच अंतःकरण (मन) असावे, जे ख्रिस्त येशूंच्याठायी होते. 6 आरंभापासूनच जरी येशूंठायी परमेश्वरी
स्वभाव होता, तरी 'परमेश्वराची बरोबरी करणे' ही बाब त्यांनी मजबूतीने धरून ठेवण्याजोगी समजली नाही अर्थात
त्यांनी ती बाब श्रेष्ठ (मोठी गोष्ट) जाणली नाही. 7 परंतु येशूंनी आपले सर्व वैभव (महिमा) बाजूला सारले, ते दुसऱ्या
मनुष्यांप्रमाणे एक मनुष्य झाले आणि त्यांनी एखाद्या बांधिलकीत (गुलामीत) असलेल्या मजूराचे स्थान घेतले. 8 पूर्ण
प्रकारे एका मनुष्याच्या स्वरूपाचे असे प्रगट होऊन, येशूंनी स्वतःला इतके लीन केले की मरण्याकरिता तयार झाले,
येथवर की क्रूसावरचे मरण देखील सहन केले. 9 म्हणूनच परमेश्वराने येशूंना सर्वोच्च असे केले आणि त्यांना एक असे नांव
दिले जे सर्व नांवांपेक्षा श्रेष्ठ (अत्युच्च) आहे. 10 यासाठी की स्वर्ग, पृथ्वी व पृथ्वीच्या खाली जे लोक आहेत त्या सर्वांनी,
येशूंच्या नांवाने आपले गुडघें टेकावेत. 11 परमेश्वर पित्याच्या गौरवार्थ आणि सन्मानार्थ प्रत्येक व्यक्तिने असे कबूल
करावे की येशू ख्रिस्त हेच केवळ प्रभू आहेत.
12 यास्तव माझ्या प्रियांनो जसे तुम्ही माझे ऐकून नेहमी त्यानुसार आज्ञापालन करीत आला आहा, तसेच तुम्ही मी
उपस्थितीत असतानाच नव्हे, तर माझ्या गैरहजेरीतही (जवळ नसतांनाही) भीत व कांपत आपले तारणवार्तेचे कार्य
करीत रहा. 13 कारण फक्त परमेश्वरच आहे ज्याचे सामर्थ्य तुमच्याठायी त्याची उत्तम (चांगली) इच्छा आणि कार्य
करावयास तुम्हांला प्रोत्साहन देत असते.
14 वादविवाद न करता आणि तक्रार (कुरकुर) न करिता प्रत्येक कार्य करीत रहा. 15 जेणेकरून तुम्ही दुष्ट व भ्रष्ट
पिढीत परमेश्वराचे निर्दोषी आणि प्रामाणिक संतान असे कायम असावे आणि जीवनाचे वचन (संदेश) दृढतेने धरून या
जगात ज्योतीसारखे चमकावे. 16 तेव्हा मला ख्रिस्तांच्या दिवशी आनंदित होता येईल, की मी व्यर्थ धावलो नव्हतो
किंवा व्यर्थ श्रमही केले नव्हते. 17 होय, जरी मी एका पेय रूपात तुमच्या विश्वासाद्वारे उत्पन्न सेवा व बलिदानावर
ओतला गेलो (अर्पण), तरीही मी तुमच्याबरोबर आनंदित होईन. 18 याच कारणास्तव तुम्ही देखील खुश व्हावे आणि
माझ्याबरोबर आनंद साजरा करावयास हवा.
19 परंतु मी येशू ख्रिस्तांवर भरंवसा ठेवितो की मी तीमथ्याला तुमच्याकडे लवकरच पाठवीन जेणेकरुन तुमच्याविषयी
ए्ेकून मला शांति प्राप्त होईल. 20 कारण तुमच्याविषयी प्रामाणिकपणे काळजी करणारा,समान विचार-धारा असणारा,
असा त्याच्याशिवाय माझ्याजवळ आणखी दुसरा कोणी नाहीये. 21 कारण प्रत्येक जण येशूंच्या कामाविषयी नव्हे, तर
आपल्याच फायद्याच्या (स्वार्थ) गोष्टींचा विचार करीत असतो. 22 पण तुम्हांला त्याचे विश्वसनीय आचरण, जसे मुलाचे
बापाकरिताचे असते, ते ठाऊक आहे आणि म्हणून तुम्हांला हे देखील माहीत आहे, की त्याने येशू-वार्ता प्रसारात

माझ्याबरोबर सेवा केलेली आहे. 23 म्हणून मला स्वत:विषयी कळताच, त्याला ताबडतोब रवाना करण्याची माझी इच्छा
आहे. 24 तरीपण मला येशूंठायी भरंवसा आहे, की मी स्वतः खूप लवकर येईन.

25 मला हे नितांत (खूप) आवश्यक वाटले, की जो माझ्या कार्यांत (सेवा) माझा भाऊ, सोबती, सैनिक, तुमचा
संदेशवाहक आणि तो आहे ज्याने माझ्या गरजा भागविल्यात, त्या एपफ्रदीताला तुमच्याकडे पाठवावे. 26 त्याचे
अंतःकरण जड झाले होते आणि तो तुम्हां सर्वांना पाहण्याची कामना करीत होता व तुम्ही त्याच्या आजाराविषयी
माहिती देखील ए◌ेकलीच होती. 27 यात कोणती शंकाच नाहीये की आजारपणामुळे तो मरणारच होता, परंतु परमेश्वराने
त्याच्यावर दया केली; त्याच्यावरच केवळ नव्हे तर माझ्यावर देखील की मला वारंवार दुःखावर दुःख होऊ नये.
28 म्हणूनच मी त्याला मोठ्या तत्परतेने पाठविले, यासाठी की जेव्हा तुम्ही त्याला पुन्हा पाहाल, तेव्हा तुम्ही आनंदित
व्हावे आणि मला अधिक दुःख होऊ नये. 29 त्याला ख्रिस्तांठायी प्रचंड आनंदाने ग्रहण करा आणि अशा लोकांचा आदर
करीत रहा. 30 माझ्याकरिता तुम्ही केलेल्या सेवेचा अपुरेपणा (कमतरता) पूर्ण करता यावा म्हणून, तो ख्रिस्तांच्या
कार्याखातर आपल्या जीवनाची पर्वा न करता, मृत्यूजवळ पोहचलाच (मरणार) होता.

# 3

1 सरतेशेवटी भाऊबहिणींनो, येशूंमध्ये आनंदित रहा. एकच गोष्ट वारंवार तुम्हांला लिहीत असताना, मला कंटाळा
म्हणून येत नाहीच, परंतु ती तुमच्याकरिता लाभदायक अशीच बाब आहे.

2 कुत्र्यांपासून सावध असा. वाईट कार्य करणाऱ्यांविषयी सतर्क रहा! शरीराचे भाग छाटणाऱ्यांपासून (कापाकापी
करणारे) सावध असा!

3 आपण असे यहूदी (सुंता झालेले) आहोत जे आत्म्यानें परमेश्वराची आराधना करीत , आणि ख्रिस्त येशूंठायी आनंदी
होत असतात व जे शारीरिक बाबींवर भरंवसा करीत नसतात. 4 तरी मी बाह्य रीति- विधींवर (शरीर) भरंवसा ठेवण्याचा
बहाणा करु शकत होतो.

5 माझी सुंता आठव्या दिवशी झालेली होती. मी इस्त्राएलाच्या वंशातील, बन्यामीन कुळाचा आणि इब्र्यांचा इब्री
आहे. यहूदी धर्माच्या दृष्टीने, म्हटले तर एक परूशी; 6 प्रचंड उत्साहाविषयी म्हणाल तर चर्चला छळणारा,
नियमशास्त्राच्या आधारे नीतिमत्वाविषयी म्हणाल तर, निर्दोषी ठरलेला असा.

7 जे सर्व काही माझ्या लाभाचे होते, ते सर्व काही मी ख्रिस्तांखातर हानिचे असे समजून घेतले. 8 होय, खरोखर ‘माझे
प्रभू, येशू ख्रिस्त यांच्याविषयीचे ज्ञान प्राप्त करून घेणे’ या श्रेष्ठ बाबीपुढे मी सर्व काही हानि असेच समजतो;
ज्यांच्यासाठी मी सर्व प्रकारचे नुकसान सोसले आणि सर्व गोष्टी केरकचरा अशा समजतो, ते केवळ याकरिता, की
ख्रिस्त प्राप्त करून मी त्यांच्याठायी कायम जगणारा (आढळणारा) असा असावे. 9 नियमशास्त्राच्या पालनाद्वारे मला
मिळणारे माझे स्वतःचे नीतिमत्व नव्हे, पण ते नितिमत्व जे ख्रिस्तांवरील विश्वासामुळे आहेआणि जे विश्वास ठेवण्याद्वारें
परमेश्वरापासून मिळते. 10 यासाठी की मी येशूंना, त्यांच्या पुनरूत्थानाच्या (जिवंत उठण्याच्या) सामर्थ्याला, व त्यांच्या
मृत्यूच्या समानतेत, त्यांच्या दुःखाची सहभागिता ओळखून घ्यावी. 11 म्हणजे कसेही करून मेलेल्यांमधून, जिवंत
होण्याच्या (पुनरूत्थान) अवस्थेपर्यंत मला पोचता यावे.

12 मी सर्व काही मिळवून घेतलेले आहे किंवा पूर्णपणे सिद्ध केलेला असा आहे असे नाही, पण मी यासाठी नेटाने पुढे
जातोच आहे की ख्रिस्त येशूंनी मला ज्यासाठी निवडले होते, ते प्राप्त करून घेणे मला शक्य व्हावे. 13 बंधूभगिनींनो, मी ते
मिळवून घेतलेले आहे असे मी समजत नाही; पण मी एक काम करीत असतो : जुन्या गोष्टी विसरून न थांबता पुढे
येणाऱ्या गोष्टींकडे, चालत जातोच आहे. 14 परमेश्वराचे वरील पाचारण (बोलाविणे) जे त्याने मला ख्रिस्त येशूंठायी
केलेले आहे त्याच्या बक्षिसासाठी खुणेकडे (लक्ष्य/निशाण) मी पुढे-पुढे वाटचाल करितो आहे.

15 यास्तव आपल्यापैकी जे परिपक्व (समंजस) आहेत त्या सर्वांनी असेच मन ठेवावे; जर एखाद्या गोष्टीविषयी तुमचा
विचार (वृत्ति) काही वेगळा असेल, तर परमेश्वर त्यांविषयी तुम्हांवर प्रगट करील. 16 काहीही झाले तरी, ज्या मापाने

आपण प्राप्त केलेले आहे त्याच नियमानुसार आपण आपले जीवन जगावे, आणि नेहमी एकाच मनाचे असे असावे.
17 भाऊबहिणींनो, आम्ही तुमच्याकरिता एक नमूना आहोत म्हणून दुसऱ्यांबरोबर एकत्र मिळून माझ्यासारखे जीवन
जगा, आणि जे असेच (नमुन्याप्रमाणे) जगतात त्यांच्याकडे लक्ष देखील असू द्या . 18 बरेच लोक ख्रिस्तांच्या क्रूसाचे वैरी
असल्यासारखे जीवन जगतात. पहा, मी तुम्हांला त्यांच्याविषयी अनेकदां सांगितलेले आहे, आणि आताही रडून
कळकळीने तेच सांगतो आहे. 19 त्यांचा अंत विनाश आहे. त्यांचा ईश्वर त्यांचे पोट आहे. त्यांच्या निर्लज्जपणावर त्यांना
अभिमान (गर्व) आहे. त्यांचे संपूर्ण लक्ष (मन) जगिक गोष्टींवर लागलेले आहे. 20 परंतु आपले नागरिकत्व स्वर्गाचे आहे.
तेथूनच प्रभू येशू ख्रिस्तांच्या येण्याची, आपण वाट पाहात आहोत. 21 येशूंच्या स्वत:च्या तेजोमय देहासारखाच आपल्या
देह व्हावा म्हणून, येशू आपल्या सर्वांचा नाशमय (होणारा) देह त्यांच्या तेजोमय देहाप्रमाणेच करतील. सर्व वस्तूं
आपल्या स्वतःच्या नियंत्रणात करण्यायोग्य येशूंठायी जे सामर्थ्य आहे, त्याच सामर्थ्याने येशू असे करतील.

# 4

1 यास्तव माझ्या प्रिय भाऊबहिणींनो, ज्या तुम्हांमध्ये (ठायी) माझा जीव लागलेला असतो आणि जे तुम्ही माझा आनंद
आणि मुकूट आहां, ते तुम्ही सर्व जण येशूंमध्ये स्थिर रहा.
2 मी युवदीयेला आणि सुंतुखेला अशी विनवणी करितो की त्या दोघींनी ख्रिस्तांठायी एकमन होऊन स्थिर रहावे.
3 माझ्या खऱ्या सोबत्या, मी तुला अशी विनंती करितो की तू त्या स्त्रियांची मदत करावीस, ज्यांनी येशू-वार्ता प्रसाराच्या
कामी माझ्याबरोबर श्रम केलेत. तू, क्लेमेंत आणि दुसऱ्या कार्यकर्त्यांनी देखील येशू-वार्तेकरिता परिश्रम केलेत व त्यांची
नांवे जीवनाच्या पुस्तकांत आहेत. 4 येशूंमध्ये सदैव आनंदी रहा, मी पुन्हा म्हणतो आहे, आनंदित राहत चला. 5 तुमची
सज्जनता (सौजन्य-कोमलता) सर्वांना पाहता यावी. येशू अचानक येतील (त्यांचे येणे समीप आहे). 6 कोणत्याही
प्रकारची चिंता करू नका, परंतु प्रत्येक परिस्थितीत तुमच्या विनंत्या, आभार प्रदर्शनांसमवेत, परमेश्वरापुढे आणल्या
जाव्यात. 7 म्हणजे परमेश्वर पित्याची शांति जी समजता येणे अशक्य आहे, ती शांति तुमची हृदयें व अंतःकरणें ख्रिस्त
येशूंठायी सांभाळील.
8 सरतेशेवटी भाऊबहिणींनो, जे काही सत्य आहे, ज्या गोष्टींत प्रामाणिकपणा आहे, न्याय आहे, ज्या गोष्टीं शुद्ध, सुदंर
आणि ऐकण्यायोग्य अर्थात उत्तम आहेत, त्यांच्याकडे लक्ष द्या. एखादे भलेपणाचे कृत्य आणि स्तुतिची बाब असेल तर
त्यावर मनन करा. 9 तुम्ही माझ्यापासून जे शिकला, स्वीकार केले, ऐकले आणि माझ्याठायी पाहिले, तेच करा आणि
शांतिचा परमेश्वर तुम्हांबरोबर राहील.
10 मी येशूंठायी खूप आनंदी आहे, की तुम्ही पुन्हा एकवार माझ्याविषयी काळजी (रूचि) करू लागला आहा. या पूर्वी
तुम्हांला माझी काळजी तर होतीच, पण मोका मिळालेला नव्हता. 11 मी आपल्या गरजांविषयी तुम्हांला सांगतो आहे
असे नाही; पण ज्या स्थितीत आहे त्यात समाधानी राहण्याचे मी शिकून घेतले आहे. 12 कमतरता असो किंवा भरपूरी,
दोन्ही प्रकारचे अनुभव माझ्याजवळ (मला) आहेत. प्रत्येक ठिकाणी आणि प्रत्येक गोष्टीत मला शिकविले गेले आहे की
भरल्यापोटी कसे रहावे आणि भूक कशी सहन करावी; विपुलतेचा आनंद कसा घ्यावा आणि गरज भागविता आली
नाही तर पीडा कशी सहन करून घ्यावी. 13 ‘येशू’ जे मला सामर्थ्य देत असतात, त्यांच्या साहाय्याने मी सर्व स्थितींत
(दशा/ अवस्था) राहू शकतो.
14 आणि मी खुश आहे की तुम्ही माझ्या संकट समयी माझे भागीदार झाला. 15 फिलिपैच्या चर्चचे लोकहो, येशू-वार्ता
प्रसाराच्या कार्याप्रारंभी, ज्या वेळी मी मासेदोनियातून बाहेर पडणार होतो, तुमच्यावांचून इतर कोणी देखील
देण्याघेण्याविषयी माझे साहाय्य केलेले नव्हते, याविषयी तुम्हांलाही ठाऊक आहे. 16 जेव्हा मी थेस्सलनीकांत होतो,
तेव्हाही तुम्ही वारंवार माझ्या गरजा भागविल्या होत्या. 17 सहयोगाचा (दानाचा) भुकेला व हपापलेला असल्यामुळे मी
असे म्हणतो आहे असे नाहीये. 18 माझी इच्छा हीच आहे, की तुमच्या खात्यांत विपुलतेने साठलेले (संचय) असावे.
माझ्याजवळ सर्व काही विपुलतेने आहे. एपफ्रदीताच्या हातून तुम्ही जे काही मला पाठविले, ते प्राप्त करून मी भरपूर

झालो आहे. ते सर्व काही जणूकाही सुगंधित अत्तर, परमेश्वराला प्रसन्न करण्याजोगे आणि ग्रहणयोग्य बलिदान (कुर्बानी)
असे आहे. [19] माझा परमेश्‍वर, ख्रिस्त येशू, आपल्या महिमेठायी असलेल्या धनसंपत्तिनुसारच, तुमच्या सर्व गरजां पूर्ण
(भागविणे) करोत.
[20] आता आमच्या परमेश्वर पित्यास स्तुति आणि आदर (गौरव) सदाकाळ असो. होय, असे अवश्य व्हावे.
[21] ख्रिस्तांचा प्रत्येक पवित्र जण आणि माझ्याबरोबर जे बंधुगण आहेत, त्यांचाही यांत समावेश (सामिल)आहे. [22] सर्व
पवित्र लोक, तुम्हां सर्वांना आणि विशेषकरून कैसराच्या कुटूंबाच्या लोकांना सलाम सांगतात.
[23] स्वामी येशू ख्रिस्त यांची कृपा तुम्हां सर्वांवर कायम असो. होय, असेच व्हावे.